अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २५/०३/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १२/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | १) डॉ. श्रीमती रेश्मा हिरामन साबळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी<br>२) श्री. गोविंद गणपत घावट, श्रमिक, बी वॉर्ड, म.न.पा., रामचंद्र भट्ट मार्ग, जे.जे. रूग्णालय समोर, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ६,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. ६,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे रेस्टॉरन्ट असून रेस्टॉरन्टचा आरोग्य विभागाचा परवाना दिनांक २१/०२/२०२५ रोजी संपत आहे. त्यामुळे तक्रारदार हे रेस्टॉरन्टचा सदरहू परवाना वार्षिक नुतनीकरण करण्याकरीता बी वॉर्ड, मनपा, मुंबई कार्यालयात गेले असता, तेथील लोकसेवकांनी तक्रारदार यांना लोकसेवक डॉ. श्रीमती रेश्मा हिरामन साबळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना भेटण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार हे लोकसेवकांना भेटण्यास गेले असता, तेथील लोकसेवक श्री. गोविंद गणपत घावट, श्रमिक यांनी सांगितले की, सदर कामाकरीता तुम्हाला मॅडमना रू. ६,०००/- दयावे लागतील तरच त्या तुमचे रेस्टॉरन्टचा परवाना एनटीआर (Not to Renew) मधून काढतील त्यानंतर तुम्ही नुतनीकरणाचे पैसे ऑनलाईन भरून तुमच्या हॉटेलचा वैद्यकीय परवाना नुतनीकरण करू शकाल. त्यानंतर तक्रारदार हे वेळोवेळी डॉ. रेश्मा साबळे यांना भेटले असता, त्यांनी देखील प्रथम रू. ६,०००/- दया असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना विनंती केली की, ''तुम्ही माझे एनटीआर काढा मी माझा परवाना नुतनीकरण करतो. त्यानंतर मी तुमचे रू. ६,०००/- देतो.'' परंतू डॉ. रेश्मा साबळे यांनी तक्रारदार यांचे रेस्टॉरन्ट परवानाचे काम केले नाही. लोकसेवक डॉ. रेश्मा हिरामन साबळे यांनी त्यांचे लॉगीन आयडी वरून लॉगीन केल्याशिवाय तक्रारदार यांचे परवाना नुतनीकरणाचे काम होणार नव्हते. तक्रारदार यांना लोकसेवकांस लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २१/०३/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक डॉ. रेश्मा हिरामन साबळे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे रेस्टॉरन्टचे परवाना नुतनीकरणाकरीता रू. ६,०००/- इतक्या लाचेची मागणी करून स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे दिनांक २४/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक डॉ. रेश्मा साबळे यांच्यावतीने लोकसेवक श्री. गोविंद गणपत घावट, श्रमिक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. ६,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री. नारायण सरोदे, पोलीस निरीक्षक पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. निरज उबाळे, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**

**टोलफ्री क्र.** १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८

**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in

**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net